मिरा भाईंदर महानगरपालिका
पर्यावरण विभाग
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ६० /२०२२-२३ दि. २४ /०८ /२०२२

## // जाहिर सूचना //

### पी. ओ. पी. मूर्तीवरील बंदी आदेशाबाबत

मे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी मूर्ती विर्सजनाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मार्गदर्शक सूचना जाहिर केल्या आहेत. मिरा भाईंदर शहरातील सर्व मूर्ती बनविणाऱ्या व्यावसायिकांना कळविण्यात येते की, मे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांनी दि. १२/०५/२०२० रोजी प्रकाशित केलेल्या पी.ओ.पी. मुर्तीबाबतच्या नव्या मार्गदर्शक तत्वानुसार पी.ओ.पी. मुर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आलेली आहे.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थावर सदर मार्गदर्शक तत्वांची अंमलबाजवणी करणे बंधनकारक असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मिरा भाईंदर शहारातील मूर्ती उत्पादक कारागीर कामगार व इतर सर्व संबधितांना कळविण्यात येते की, यापुढे पी. ओ. पी. मूर्ती उत्पादनावर बंदी असल्याने उत्पादकांनी पी.ओ.पी. ची मूर्ती उत्पादन करु नये, अन्यथा मे. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे मार्गदर्शक तत्वानुसार कारवाई करण्यात येईल.

सदर मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी दि. ०१/०१/२०२१ पासून बंधनकारक केलेली आहे. सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी त्वरित करणे व मूर्ती उत्पादक, कारागीर, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व इतर सर्व संबंधितांमध्ये तसेच विसर्जन हौदामध्ये / घरगुती गणेशमूर्ती विसर्जन याबाबत जागरुकता निर्माण करणेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केलेल्या आहेत.

**श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**श्री. हसमुख गेहलोत**
**उपमहापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**श्री. दिलीप ढोले**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**